# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### ढोकी (ता.जि.उस्मानाबाद) येथील तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखान्यातील कर्मचाऱ्यांचे पगार थकीत असल्याबाबत

**(१) २८१८८ (०२-११-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ढोकी (ता.जि.उस्मानाबाद) येथील तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना, तेरणानगर, येथील कर्मचाऱ्यांचे पगार मागील कित्येक महिने थकीत असून त्यांचा पीएफ कारखाना प्रशासकाने भरला नसल्याची बाब माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील काही कालावधीत पगार न होणे व पीएफ न भरल्यामुळे कित्येक कर्मचा-यांचे नुकसान झाले असून त्याची कारणे काय आहेत, याची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२८-०५-२०१८) :** (१) लेक्षापरीक्षण अहवाल सन २०१० ते २०१४ नुसार ही बाब निदर्शनास आली आहे. तथापि सदर बाबत प्रशासकाचा थेट संबंध नाही.

(२) गाळप हंगाम सन २०१२-१३ पासून तेरणा कारखान्याचे ऊसाचे गाळप घेण्यात आलेले नाही. कारखाना बंद आहे. लेखापरीक्षण अहवालामध्ये पीएफ चा भरणा न केल्याबाबत आक्षेप नोंदविण्यात आलेला आहे.

(३) राज्यातील सहकारी साखर कारखान्याचे कामगारांच्या थकीत वेतनासाठी सद्य:स्थितीत शासनाकडून अर्थसहाय्य देण्याबाबतचे कोणतेही धोरण अथवा योजना नाही. त्यामुळे तेरणा सहकारी साखर कारखान्याच्या कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन देणेबाबत शासनाने कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नितळी (ता.जि.उस्मानाबाद) येथील आर्यन शुगर्स लि.या साखर कारखान्याने शेतकऱ्यांचे उसाचे पैसे अदा न केल्याबाबत

**(२) २८१९० (०२-१२-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नितळी (ता.जि.उस्मानाबाद) येथील जय लक्ष्मी साखर कारखाना व बार्शी तालुक्यातील आर्यन शुगर्स लि.या साखर कारखान्याने गत हंगामात गाळप केलेल्या उसाचे पैसे अद्याप शेतकऱ्यांना मिळाले नसल्याने ते मिळणेबाबत मा.जिल्हाधिकारी व स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडे उस्मानाबाद तालुक्यातील शेतकरी वारंवार मागणी करत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांना गाळप केलेल्या उसापोटी या कारखान्यांचे किती रुपये देणे बाकी आहे,

(३) तसेच, सदर रक्कम शेतकऱ्यांना केव्हा पर्यंत उपलब्ध होईल व ते उपलब्ध करुन देण्यासाठी शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१८-०५-२०१८) :** (१) व (२) हंगाम २०१४-१५ मधील ऊस गाळपाचे FRP प्रमाणे दि. १५/११/२०१५ अखेर जयलक्ष्मी शुगर्स लि. नितळी या कारखान्याकडे रु. ७६९.२० लाख रक्कम व आर्यन शुगर लि. बार्शी या कारखान्याकडे रु. २१०५.१४ लाख थकीत आहेत.सदरची रक्कम मिळणेस्तव ऊस पुरवठादार शेतकरी व शेतकरी संघटना यांनी सदर कारखाने, स्थानिक लोकप्रतिनिधी व जिल्हाधिकारी, उस्मानाबाद व सोलापूर यांचेकडे मागणी केली.

(३) शुगरकेन कंट्रोल ऑर्डर, १९६६ मधील तरतुदीनुसार जयलक्ष्मी शुगर्स लि. जि.उस्मानाबाद यांचेवर दि.०२/०२/२०१५ चे आदेशान्वये रु. ३६९.३४ लाख व दि.२०/०८/२०१५ चे आदेशान्वये रु. ३९९.८३ लाख तर आर्यन शुगर लि.बार्शी, जि.सोलापूर यांचेवर दि. २६/०५/२०१५ चे आदेशान्वये रु. २११३.५३ लाख रक्कमेची Revenue Recovery Certificate (RRC) कारवाईचे आदेश संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडे निर्गमित केलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आश्रमशाळांना धान्यपुरवठा करण्यासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत

**(३) ३०५९३ (१८-०१-२०१६). ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात यावर्षी प्रकल्प कार्यालयाना प्रथमच आश्रमशाळांना लागणारे धान्य व किराणा वस्तु खरेदीचे अधिकार देण्यात आले असूनही निविदी काढण्यात उशीर होत असल्याने दोन महिने उलटूनही आश्रमशाळांना धान्य पुरवठा झालेला नसल्याने विद्यार्थ्यांच्या जेवणाची सोय करताना मुख्याध्यापक व अधिक्षकांना समस्या निर्माण होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आश्रमशाळांना सुरळीत धान्यपुरवठा करण्यासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (११-०५-२०१८) :** (१) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय दि.०४.०३.२०१४ अन्वये शासकीय आश्रमशाळा व वसतीगृहांना अन्नधान्य, कडधान्य, इतर किराणा तसेच शैक्षणिक साहित्य व इतर वस्तुंचा पुरवठा करणेबाबत खरेदी धोरण निश्चित करण्यात आले आहे. सदर अधिकारी अपर आयुक्त, आदिवासी विकास यांच्या अध्यक्षतेखालील समिती क्रमांक (३) यांना प्रदान करण्यात आलेले.
(२) शासन पत्र दि.२१.०४.२०१५ अन्वये आश्रमशाळा व वसतीगृहातील विद्यार्थ्यांना अन्नधान्य व किराणा वस्तु खरेदी करण्यासाठी ऑनलाईन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यासाठी मार्गदर्शक सुचना देण्यात आल्या होत्या. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सह.आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक यांच्या दि. १३.०५.२०१५ नुसार एकाधिकार खरेदी योजनेत खरेदीत करण्यात आलेला माल शासकीय आश्रमशाळा/वसतीगृहांना पुरवठा करण्यात येत असल्याने सदर माल वगळून उर्वरित अन्नधान्य, कडधान्य व किराणा मालाचा पुरवठाकरण्यासाठी सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षाकरिता ई-निविदा मागवून खरेदीची कार्यवाही करण्यात आलेली आहे. निविदा अंतिम होईपर्यंत दरम्यानच्या कालावधीत स्थानिक स्तरावरुन व्यवस्था करण्यात आली होती.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडचिरोली जिल्ह्यातील अधिसूची ५ प्रमाणे गावे पेसा अधिसूची ५ मधून वगळण्याबाबत**

**(४) ४९५१६ (२९-०४-२०१६). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्ह्यात पेसा कायद्याअंतर्गत जवळपास ८०% गावाचा समावेश करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ज्या गावांमध्ये ५०% पेक्षा जास्त गैरआदिवासी आहेत अशा गावांचा पेसा अंतर्गत गावांमध्ये व ५०% पेक्षा जास्त आदिवासी असणाऱ्या गावांचा पेसा बाहेरील गावांमध्ये समावेश केलेला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे आदिवासी व गैर आदिवासी यांच्यावर प्रचंड अन्याय होत असल्याने पुनर्सर्वेक्षण करणे अत्यावश्यक झालेले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, ज्या गावांमध्ये आदिवासी ५०% च्या खाली आहेत व गैर आदिवासी (ओ.बी.सी.,एस.सी.,एन.टी.इत्यादी) ५०% च्या वर आहेत अशी गावे पेसा अधिसूचना ५ मधून वगळण्यात यावी या करिता आंदोलने होत आहेत, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. विष्णु सवरा (११-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे
(२) अंशत: हे खरे आहे.
(३) अनुसूचित क्षेत्र हे अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येचे प्राबल्य, भौगोलिक संलग्नता व अशा क्षेत्राचे इतर क्षेत्रापेक्षा असलेले आर्थिक मागासलेपण या निकषाच्या आधारे घोषित केले जाते. मा.राष्ट्रपती, भारत सरकार यांनी दिनांक २ डिसेंबर, १९८५ रोजीच्या अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र राज्याचे अनुसूचित क्षेत्र घोषित केलेले आहे. अनुसूचित क्षेत्रामध्ये नव्याने गावांचा समावेश करणे अथवा वगळणे याबाबतचे अधिकार मा.राष्ट्रपती भारत सरकार यांना आहेत.
(४) हे खरे नाही,

मात्र, देसाईगंज तालुक्यातील कोरेगांव, अरततोंडी तसेच चामोर्शी तालुक्यातील गिलगांव, जयरामपुर, जोगना, ब्राम्हणीदेव या गावांचे पेसा मधून वगळण्याबाबत जिल्हा परिषद गडचिरोली यांचेकडे निवेदन प्राप्त झाले आहे.
(५) गडचिरोली जिल्हयातील अनुसूचित क्षेत्राशी भौगोलिकदृष्टया संलग्न असणे व आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण ५०% पेक्षा जास्त असणे या केंद्र शासनाच्या निकषांत बसणाऱ्या गावांचा समावेश नव्याने अनुसूचित क्षेत्रामध्ये करण्याबाबतचा परिपुर्ण प्रस्ताव, आयुक्त आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे यांच्याकडून प्राप्त करुन घेण्यात येत असून तो केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येईल.

---

**राज्यातील बोगस सहकारी संस्थाबाबत**

**(५) ५८६२५ (२२-०८-२०१६). डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात २ लाख ३० हजार सहकारी संस्थापैकी ७० हजार सहकारी संस्था बोगस असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठाण्यातील १०० हून अधिक सहकारी संस्था या केवळ कागदावरच असल्याची धक्कादायक बाब माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील ७० हजार बोगस संस्थांना सहकार विभागाने कारणे दाखवा नोटीस बजावली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सहकारी संस्थावर नियंत्रण ठेवण्यासाठी सहकार आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) तसेच या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(६) चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (११-०६-२०१८) :** (१) नाही, तथापि ५४१२४ संस्था बंद / कार्यस्थगित असल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) नाही.

(३) बंद / कार्यस्थगित असलेल्या संस्था अवसायनात घेण्यात आल्या आहेत.
(४) नाही.
(५) नाही.
(६) ४३,४१४ संस्था अवसायनात घेण्यात आल्या असून त्यापैकी २६,४१२ संस्थांची नोंदणी रद्द करण्यात आली आहे.

---

**महसूल व वन विभागाच्या अतिक्रमित जमिनीचे पट्टे नावावर करणेबाबत**

**(६) ६३५७१ (२२-०८-२०१६). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील दलित आदिवासी समाजाच्या भूमिहीन लोकांनी आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहाकरिता महसूल व वन विभागाच्या पडित जमिनी मशागत करुन लागवडीखाली आणून त्यातून वर्षानुवर्षे पीके घेण्यात येत असतानाही सदर जमिनीचे पट्टे त्यांच्या नावावर झालेले नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी मानवी हक्क सुरक्षा दल या संघटनेने मा.महसूल मंत्री व मा.वन मंत्री यांचेकडे २ मे, २०१६ रोजी निवेदन देऊन, अतिक्रमणधारकांच्या ताब्यात असलेल्या महसूल व वन विभागाच्या जमिनी कसणाऱ्यांच्या नावे करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, मानवी हक्क सुरक्षा दल संघटनेच्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(४) तसेच उक्त मागण्याच्या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (११-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्काची मान्यता) अधिनियम २००६ व नियम २००८ आणि सुधारणा नियम २०१२ अंतर्गत विदर्भातील ११ जिल्हयांमध्ये एकूण ४९,१८६ इतके वैयक्तिक वनहक्क दावे मंजूर करण्यांत आले आहेत. त्यामध्ये बुलढाणा-२६६, अकोला-४८, अमरावती-१०८६, यवतमाळ-३२९, वाशिम-१०१, वर्धा-२०४, नागपूर-६८३, भंडारा-२६३२, गोंदीया-८९६८, चंद्रपूर-३७५५ व गडचिरोली जिल्हयातील-३१११४ कुटुंबांचा समावेश आहे.
(२) मानवी हक्क सुरक्षा दल या संघटनेचे दिनांक २ मे, २०१६ रोजीचे निवेदन मा.मंत्री (महसूल) व मा.मंत्री (वने) यांचे कार्यालयामध्ये आढळून आले नसल्याबाबत महसूल व वन विभागाने कळविले आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयांतर्गत आश्रम शाळांमध्ये विद्यार्थ्यांचा झालेला मृत्यू

**(७) ६९१७० (११-०१-२०१७). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोखाडा व जव्हार तालुका (जि.ठाणे) आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयांतर्गत आश्रम शाळांमध्ये १५ ते २० विद्यार्थ्यांचा मृत्यु झाल्याची बाब दिनांक २० सप्टेंबर २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जव्हार मध्ये ६ मोखाडयात २ विक्रमगड २, वाडा ३ अशा तऱ्हेने प्रत्येक तालुक्यात कुपोषणामुळे आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना प्राण गमवावा लागला, त्यास जबाबदार असलेल्या संबंधीत अधिकाऱ्यांविरोधात कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) एकात्मिक आदवासी विकास प्रकल्प, जव्हार अंतर्गत जव्हार, मोखाडा, वाडा अणि विक्रमगड या चार तालुक्यांतील ३० आश्रम शाळांपैकी सर्वच आश्रम शाळांत शौचालये, न्हाणीघर नसणे, खिडक्या, पडक्या भिंती, छताची झालेली मोडतोड अशी परिस्थिती असताना आदिवासी विकास प्रकल्पा अंतर्गत खर्च होणारा निधी कोणत्या कारणांकरीता खर्च करण्यात आला,

(४) आश्रम शाळांवर गेल्या पाच वर्षात १,७३० कोटी रूपये खर्च करूनही या शाळांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्याच्या संख्येत मोठ्या प्रमाणात घट झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, विद्यार्थ्यांच्या संख्येत घट झाली त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (३०-०५-२०१८) :** (१) होय. प्रकल्प अधिकारी, जव्हार, जि.पालघर अंतर्गत सन २०१५-१६ ते सन २०१६-१७ या कालावधीत शासकीय आश्रमशाळांमध्ये २० विद्यार्थ्यांचा मृत्यू झालेला आहे.

(२) कुपोषणामुळे विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आलेले नाही. मात्र विविध अन्य कारणांनी विद्यार्थ्यांचे मृत्यू झालेले आहेत. त्यामध्ये सर्पदंश, मेंदुच्या आवरणामध्ये रक्तस्त्राव, मेंदुचा क्षयरोग, ताप-कार्डीयोक शॉक, शरीरात सुज, ॲनिमिया इत्यादी कारणाने ८ विद्यार्थ्यांच्या मृत्यू उपचारादरम्यान झालेला आहे. तसेच पालकांच्या ताब्यात १२ अशा एकूण २० विद्यार्थ्यांचा मृत्यू झालेला आहे. त्यामध्ये रक्तकॅन्सर सर्पदंश, ताप, मेंदुमध्ये रक्तस्त्राव, सिकलसेल, मेंदुचा, क्षयरोग, कावीळ, ॲनेमिया, विषमज्वर, हॉर्ट अटॅक, अपघात व आत्म्हत्या अशा विविध कारणांनी विद्यार्थ्यांचा मृत्यू झालेला आहे.

प्रस्तुत प्रकरणी प्रकल्प कार्यालय व अपर आयुक्त कार्यालय यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली असून चौकशीअंती दोषी असणाऱ्या संबंधित कर्मचाऱ्यांविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात आली आहे.

(३) जव्हार प्रकल्पांतर्गत ३० शासकीय आश्रमशाळांमध्ये मुलांसाठी ३११, मुलींसाठी ३३६ शौचालये व मुलांसाठी २१२, मुलींसाठी ३०१ स्नानगृहे उपलब्ध आहेत. ३० शासकीय

आश्रमशाळांपैकी जी+१ टाईप प्लॅन नुसार ३ दाभोसा, न्याहाळे, भोपोली बांधकाम पूर्ण झाले असून सद्य:स्थितीत वापरात आहेत व १३ आश्रमशाळांचे जी+२ टाईप प्लॅन नुसार नवीन इमारतीचे बांधकाम मंजूर आहे. त्यापैकी ३ गोदे, हिरवे व साखरे या आश्रमशाळांचे बांधकाम पूर्ण झाले असून सद्य:स्थितीत वापरात आहेत. उर्वरित १० आश्रमशाळांचे बांधकाम प्रगतीत आहे.

तसेच आश्रमशाळांमधील पडक्या भिंती, छताचे कौल, शौचालय, न्हाणीघर व खिडक्या इत्यादी बाबींची तातडीची असलेली किरकोळ दुरुस्तीची कामे जिल्हास्तरीय योजनेतून दुरुस्तीसाठी प्राप्त निधीतून करण्यात येत आहे. तसेच शाळा व्यवस्थापन समितीमार्फत उपलब्ध रु.१.०० लक्ष निधीतून आश्रमशाळा दुरुस्तीची कामे करण्यात येत आहेत.

(४) जव्हार प्रकल्पांतर्गत सन २०१५-१६ मध्ये शासकीय आश्रमशाळांमध्ये मंजूर विद्यार्थी क्षमता १५,३६१ असून १७७२२ विद्यार्थ्यांना व सन २०१६-१७ मध्ये शासकीय आश्रमशाळांमध्ये मंजूर विद्यार्थी क्षमता १५,८०० असून १७३९९ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आलेला आहे. सन २०१५-१६ व सन २०१६-१७ मध्ये मंजूर विद्यार्थी क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आलेला आहे. त्यामुळे विद्यार्थी संख्येत घट झाल्याचे दिसून येत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शासकीय आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांच्या भोजनासाठी नविन भांडयांचा संच पुरविण्याबाबत

**(८) ६९९०० (११-०१-२०१७). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एकूण १२८ शासकीय आश्रमशाळांतील ५६४९० विद्यार्थ्यांच्या भोजनासाठी वापरण्यात येणारे भांडयाचे संच जीर्ण झाले असून नविन भांडी संचाची खरेदी करण्याबाबत लोकप्रतिनिधी, भिवंडी पूर्व यांनी मा.आदिवासी विकास मंत्री व सचिव, आदिवासी विकास विभाग यांच्याकडे वारंवार लेखी निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात तातडीने निविदा मागविण्याबाबत अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांनी दिनांक १६ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक व सचिव, आदिवासी विकास विभाग यांच्याकडे प्रस्ताव अंतिम मंजूरीसाठी पाठवूनही मंजूरी देण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त सर्व प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासकीय आदिवासी आश्रमशाळेत चांगल्या प्रतीचे भांडयाचे संच उपलब्ध करुन देण्याबाबत व सन २०१० पासून अद्यापही सहा वर्षाचा कालावधी उलटूनही नविन भांडी संच पुरविण्यास विलंब करणाऱ्या व जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. विष्णु सवरा (३०-०५-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षामध्ये अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांच्या अतंर्गत शासकीय आश्रमशाळांना नवीन भांडी साहित्य पुरवठा करणेसाठी ई निविदा पध्दतीचा अवलंब करून दर निश्चितीकरिता आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक शासनास प्रस्ताव सादर केला होता. तथापि प्रकरणी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्रमांक ३०५५५/२०१६ दाखल करण्यात आलेली होती व सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालयाच्या निकालानुसार निविदाधारकांची EMD दिनांक११/७/२०१७ रोजी परत करण्यात आलेली आहे. तसेच अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांचे अखत्यारितील शासकीय आरमशाळांना नवीन भांडी साहित्य खरेदी करण्याबाबतची निविदा (क्र.१६७६/२०१५) रद्द करून ज्या भांड्याची गरज आहे अशी भांडी शाळास्तरावरील शाळा व्यवस्थापन समितीच्या निधीतून विहित पध्दतीने खरेदी करण्यास शासनाच्या दि.६ जानेवारी, २०१७ रोजीच्या पत्रान्वये मान्यता देण्यात आली आहे.

अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक अंतर्गत शासकीय आश्रमशाळांमध्ये धान्य साठविण्यासाठी व स्वयंपाकासाठी व विद्यार्थ्यांच्या भोजनासाठी आवश्यक असणारी सर्व प्रकारची भांडी साहित्य खरेदी करण्यासाठी शासनाच्या दिनांक २३/१/२०१८ रोजीच्या पत्रान्वये वित्तीय मान्यता देण्यात आली आहे.

---

**आदिवासी भागात रोजगारास प्राधान्य देण्याच्या घेतलेल्या निर्णयाबाबत**

**(९) ७१६४२ (११-०१-२०१७). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी भागात रोजगारास प्राधान्य देण्याचा निर्णय मा.आदिवासी विकास मंत्री यांनी माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घेतल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रोजगार निर्मितीसाठी पालघर जिल्हयात ४ हजार हेक्टर क्षेत्रावर नारळाची लागवड करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे आदिवासी भागात हजारो कारखाने उभे राहणार असून हजारो कुटुबांना रोजगार देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आदिवासी भागातील इतर जिल्हयातही आदिवासींना रोजगार निर्मितीसाठी उद्योग उभे करण्यात येणार आहेत काय,

(५) असल्यास, शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१८-०५-२०१८) :** (१), (२) व (३) मुद्दा क्र. १, २ व ३ बाबत मा. मंत्री आदिवासी विकास यांनी दि.०९.०९.२०१६ रोजी व्यवस्थापन संचालक, महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास महामंडळ, मुंबई यांना पत्र लिहून पालघर जिल्हयाला २२२ किलोमीटर लांबीचा समुद्र किनारा लाभलेला असल्यामुळे नारळ शेतीस पोषक वातावरण आहे. त्या अनुषंगाने पालघर जिल्हयात काथ्या उद्योग सुरू करण्यासाठी प्रस्ताव व सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

(४) सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य पुरविण्यासाठी नवनिर्मित पालघर जिल्ह्यामध्ये मागील दोन वर्षात पंतप्रधान रोजगार निर्मिती योजनेंतर्गत जिल्ह्यातील एकूण २० आदिवासी युवक युवतींना एकूण रु.१०४ लक्ष प्रकल्प किंमतीचे प्रस्ताव राष्ट्रीयकृत बँकेकडून मंजूर करण्यात आले. तसेच बीज भांडवल योजनेअंतर्गत १६ लाभार्थीसाठी रु.७४.५० लक्ष प्रकल्प किंमतीचे प्रस्ताव मंजूर करण्यात आले आहे.
(५) औद्योगिक समुह विकास योजनेंतर्गत रु.५.६० लक्ष खर्चाचे नॅशनल इन्टिटयुट ऑफ फॅशन टेक्नोलॉजी, नवी मुंबई येथे चित्रवारली जव्हार कल्स्टर २३ आदिवासी युवकांना १५ दिवसाचे निवासी प्रशिक्षण देण्यात आले.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भंडारदरा (जि.अहमदनगर) रतनवाडी येथील आश्रमशाळा बंद होण्याच्या अवस्थेत असल्याबाबत**

**(१०) ७६६१८ (२८-०४-२०१७). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्ह्यातील भंडारदरा येथून २० कि.मी. अंतरावर रतनवाडी आश्रमशाळेत पहिली ते चौथी या इयत्तांमध्ये फक्त ११ विद्यार्थी शिक्षण घेत असून मुतखेल व रतनवाडी येथील ग्रामस्थ यांच्यात वाद झाल्याने पाचवी ते दहावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मुतखेल येथे हलविल्यामुळे रतनवाडी येथील आश्रमशाळा बंद होण्याच्या अवस्थेत असल्याची माहिती दिनांक २४ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू आश्रमशाळेची इमारत जीर्ण अवस्थेत असून पहिली ते चौथीच्या ११ विद्यार्थ्यांना एकाच वर्गात बसवून मुख्यापकांना शिक्षक, मुख्याध्यापक, अधीक्षक अशी भूमिका पार पाडावी लागत असून चौथीच्या मुलांना मराठी वाचता येत नसल्याचे भेटीअंती उघड झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२८-०५-२०१८) :** (१), (२), (३) व (४) रतनवाडी येथील आश्रमशाळेत इ.१ ली ते ४ थीच्या विद्यार्थ्यांची संख्या १३ एवढी होती. त्यामुळे तेथे एकच शिक्षक कार्यरत होते. सदर शिक्षकास मुख्याध्यापक/अधिक्षक व शिक्षक या सर्व भूमिका पार पाडव्या लागत होत्या.

तसेच सदर आश्रमशाळेत भौतिक सोयी-सुविधा मानाकाप्रमाणे उपलब्ध नसल्यामुळे सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात रतनवाडी येथील इ.१ ली ते ४ थीच्या वर्गाचे समायोजन शासकीय आश्रमशाळा, घाटघर येथे करण्यात आले असून तेथील विद्यार्थ्यांचे त्यांच्या पालकांच्या इच्छेनूसार इतर शासकीय/अनुदानित आश्रमशाळांमध्ये समायोजन करण्यात आले आहे.

---

## ठाणे व पालघर जिल्ह्यातील आदिवासी आश्रम शाळेतील विद्यार्थी सोयी-सुविधांपासून वंचित असल्याबाबत

**(११) ७७२०१ (२८-०५-२०१७). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे व पालघर जिल्ह्यातील आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना सोईसुविधा मिळत नसल्याने तसेच अत्याचाराच्या घटना घडत असल्याने त्यांना अनेक संकटांचा सामना करावा लागत असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आल्याने महिला व बालविकास मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली या विभागातील आश्रम शाळांना भेटी देण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती काय निदर्शनास आले तदनुसार आदिवासी आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना सोई सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली तसेच आदिवासी आश्रमशाळांतील या सोई सुविधा पुरविण्यास दिरंगाई करणाऱ्या संबंधित कर्मचारी व अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२८-०५-२०१८) :** (१) ठाणे व पालघर जिल्ह्यात डहाणू, जव्हार व शहापूर ही प्रकल्प कार्यालय असून त्याअंतर्गत ८६ शासकीय आश्रमशाळा कार्यरत आहेत. सदर आश्रमशाळांमध्ये एकूण ४३,१०८ विद्यार्थी प्रवेशित असून त्यांना शासन नियमानूसार देय असलेल्या सोयी सुविधा पुरविल्या जातात.

शासकीय आदिवासी आश्रमशाळेतील मुलींवर झालेल्या अत्याचार प्रकरणाची चौकशी करण्यासाठी गठीत विधानमंडळ महिला सदस्यांची तदर्थ समितीने दि.११ नोव्हेंबर, २०१६ रोजी ठाणे जिल्ह्यातील भिनार, ता.भिवंडी व शेणवे, ता.शहापूर येथील शासकीय आश्रमशाळा तसेच अनुदानित आश्रमशाळा भातसई, ता. शहापूर या ठिकाणी भेट दिली होती. सदर दौऱ्याच्या वेळी समितीने केलेल्या सूचनांची पुर्तता करण्यात आली आहे.

(२), (३) व (४) सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात ठाणे व पालघर जिल्ह्यात शासकीय आश्रमशाळेत अत्याच्याराची घटना घडली असल्याची बाब आढळून आली नाही.

---

## राज्यातील सुतगिरण्याची तपासणी करण्यांसाठी अभ्यास गट (समिती) स्थापन करण्याबाबत

**(१२) ७७६१७ (२८-०५-२०१७). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १७८ सुतगिरण्यांपैकी १३० सुतगिरण्याना शासकीय अर्थसहाय्य प्राप्त होते, हे खरे आहे काय, त्यापैकी पूर्ण चालणाऱ्या केवळ ३५ सुतगिरण्या असून त्यापैंकी ७ सुतगिरण्या ह्या नफ्यात असून इतर सुतगिरण्या तोट्यात आहेत याची तपासणी करण्यासाठी शासनाने अभ्यास गट (समिती) स्थापन करण्याबाबतचे परिपत्रक माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान काढले आहे, हे ही खरे काय,
(२) असल्यास, उक्त अभ्यास गटाचा तपासणी अहवाल १ महिन्याच्या आत सादर करण्याचे निदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१२-०६-२०१८) :** (१) व (२) होय.
(३) ७ सूतगिरण्या कशामुळे नफ्यात व इतर सूतगिरण्या कशामुळे तोट्यात याची तपासणी करण्यासाठी दि.१६.१.२०१७ च्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या अभ्यास गटाचा अहवाल दि.२०.९.२०१७ च्या पत्रानुसार प्राप्त झाला होता. परंतु याबाबत सविस्तर अहवाल मागविण्यात आला होता. सदरील अहवाल दिनांक ५.४.२०१८ च्या पत्रानुसार प्राप्त झाला असून त्यावर विचार सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मराठवाडयात अनुसूचित जमाती समितीकडून मन्नेरवारलूंना बोगस जात वैधता प्रमाणपत्र दिल्याबाबत

**(१३) ७८२०९ (२८-०५-२०१७). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाडयात अनुसूचित जमाती समितीकडून मन्नेरवारलूंना बोगस जात वैधता प्रमाणपत्र दिल्याचे माहे सप्टेंबर २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार मराठवाडयातील मन्नेरवारलूंना बोगस जात वैधता प्रमाणपत्र देणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२८-०५-२०१८) :** (१), (२) व (३) सन २०१२ मध्ये अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद, कार्यालयाकडुन मोठया प्रमाणावर बिगर आदिवासी जातीच्या दावेदारांचे दावे गैर मार्गाने बेकायदेशीररित्या तसेच अधिनियम २००० व नियम २००३ मधील तरतुदींचा भंग करुन दावेदारांची प्रमाणपत्रे वैध ठरविल्याच्या तक्रारी शासनास

प्राप्त झालेल्या आहेत.तक्रारींच्या अनुषंगाने केलेल्या चौकशीमध्ये दावेदारांच्या दाव्याप्रकरणी गंभीर त्रुटी व अनियमितता असल्याबाबतचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९८१ मधील नियम ८ व १२ अन्वये एकत्रीत विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आदिवासी विकास प्रकल्प डहाणू अंतर्गत (ता.डहाणू, जि.पालघर)**
**मौजे-नंडोरे आश्रमशाळेतील असुविधांबाबत**

**(१४) ७८३३६ (२८-०५-२०१७). श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी विकास प्रकल्प डहाणू अंतर्गत (ता.डहाणू, जि.पालघर) असलेल्या मौजे नंडोरे आश्रमशाळेच्या नवीन इमारतीचे काम पूर्ण होत असले तरी जुन्या इमारतीत सुरु असलेल्या शाळेचे कार्यालयीन कामकाज पाहण्यासाठी शाळेत सफाई कामगार, सुरक्षा रक्षक नाहीत तसेच शाळेला संरक्षक भिंत नसल्यामुळे शाळेचा कारभार असुरक्षित झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, १ ली ते १२ वी पर्यंतच्या या आश्रमशाळेत एकही सफाई कामगार नसल्यामुळे शाळेत व शाळेबाहेर कचरा साचून रहाणे, शौचालयांची वेळेवर सफाई होत नसल्यामुळे शाळेत व परिसरात दुर्गंधी पसरणे तसेच शाळेत असलेले सोलर वॉटर बंद असल्यामुळे थंडीत मुलांना गार पाण्याने आंघोळ करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शाळेतील रिक्त पदे भरण्याबाबत मुख्याध्यापकांनी सन २०१४ पासून आजपर्यंत अर्ज वरिष्ठांकडे करुनही कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने या प्रकरणी शाळेतील रिक्त जागा भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२८-०५-२०१८) :** (१) व (२) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, डहाणू, अंतर्गत (ता.डहाणू, जि.पालघर) असलेल्या मौजे नंडोरे आश्रमशाळेमध्ये सफाई कामगार व सुरक्षा रक्षक हे पद मंजूर नसून, विद्यार्थ्यांच्या सुरक्षितता व आरोग्याच्या कोनातून सुरक्षा रक्षक हे पद रोजंदारी तत्वावर खाजगी सुरक्षा एजन्सीमार्फत भरण्यात आलेले आहे. सफाई कामगार हे पद रोजंदारी पध्दतीने भरण्यासाठी प्रकल्प कार्यालयाकडून मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे. आश्रमशाळेसाठी संरक्षक भिंत असून ती अपूर्ण असल्याने अपूर्ण संरक्षक भिंतीचे काम पूर्ण करण्यासाठी अंदाजपत्रक तयार करुन प्रशासकीय मंजूरीबाबतची कार्यवाही प्रकल्प स्तरावर करण्यांत येत आहे. शासकीय आश्रमशाळा, नंडोरे येथे ४ सोलर वॉटरचा पुरवठा करण्यात आलेला असून, सद्य:स्थितीत ४ सोलर वॉटरपैकी १ संच सुरु करण्यात आला असून विद्यार्थ्यांना गरम पाणी उपलब्ध करुन दिले जाते.

(३) व (४) आदिवासी विकास विभाग, ठाणे विभागांतर्गत वर्ग-क संवर्गातील सरळ सेवा भरती प्रक्रिया करण्यांत आली होती. परंतु स्त्री अधिक्षिका संवर्गात गुणवत्ता प्राप्त उमेदवार प्राप्त न झाल्याने सदरील पदे भरता आली नाहीत. अधिसूचना, दि.०९.०६.२०१४ अन्वये भारतीय संविधानाच्या पाचव्या अनुसूचिच्या परिच्छेद-५, उपपरिच्छेद (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित क्षेत्र असलेल्या जिल्हयांमधील अनुसूचित क्षेत्रांमधील १२ संवर्गातील सरळसेवेने द्यावयाची सर्व पदे आवश्यक शैक्षणिक अर्हता असलेल्या स्थानिक अनुसूचित क्षेत्रातील सरळसेवेची रिक्त पदे स्थानिक अनुसूचित जामतीचे उमेदवारांमधूनच भरण्यासाठी भरती प्रक्रिया करण्यात आली होती. परंतु बिगर आदिवासी हक्क बचाव समिती, शहापूर, जि.ठाणे यांनी अनुसूचित क्षेत्रातील भरतीबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र.८७८३/२०१४ दाखल केली असून मा.न्यायालयाचे आदेश दि.१५.०५.२०१५ नुसार अनुसूचित क्षेत्रातील भरतीस अंतिम आदेश होईपर्यंत अंतरिम आदेशान्वये स्थगिती देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुसद (जि.यवतमाळ) येथील आश्रमशाळेतील कामाठ्याने मुलांना केलेली मारहाण

**(१५) ७८४९७ (२८-०५-२०१७). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुसद (जि.यवतमाळ) शहरालगत असलेल्या काकडदाती ग्रामपंचायत अंतर्गत गोविंद नगरात असलेल्या इंग्रजी माध्यमाच्या शासकीय आश्रमशाळेतील कामाठ्याने (स्वयंपाक्याचा मदतनीस) दिनांक १३ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास आश्रमशाळेतील २१ विद्यार्थ्यांना एका वर्ग खोलीत बंद करुन हातातील छडी व बेल्टने अमानुष मारहाण केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुलांच्या हातापायावर माराचे व्रण उमटले असून या अमानुष मारहाणीची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित कामाठ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विष्णु सवरा (२८-०५-२०१८) :** (१), (२), (३) व (४)

दि.१४/१२/२०१६ रोजी सदर शाळेतील श्री. डी. एल. जुमनाके, कामाठी याने विद्यार्थ्यांना छडीने मारहाण केल्याची बाब निदर्शनास आली. त्यामुळे त्याला दि.१५/१२/२०१६ रोजी निलंबित करण्यात आले होते. तसेच त्यांच्या विरूध्द विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे. तसेच श्री. जुमनाके, कामाठी यांच्या विरूध्द पालकांनी पोलीस स्टेशन, पुसद (शहर) मध्ये भा. दं. सं. कलम १८३० मधील ३२४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच सदर शाळेतील प्रभारी मुख्याध्यापक, प्रभारी पुरूष अधीक्षक यांना सुध्दा सदर प्रकरणी कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांची दुसऱ्या शाळेवर बदली करण्यात आली आहे.

---

**सिल्लोड-सोयगाव (जि.औरंगाबाद) तालुक्यात कांदा, मिरची या पिकांचे भाव कमी झाल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत आल्याबाबत**

**(१६) ७९४७९ (२८-०५-२०१७). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिल्लोड-सोयगाव (जि.औरंगाबाद) तालुक्यात कांदा, मिरची या पिकांचे भाव कमी झाल्याने येथील शेतकरी मोठ्या प्रमाणात आर्थिक अडचणीत सापडले असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (३१-०५-२०१८) :** (१) व (२) नाही.

सिल्लोड सोयगाव तालुक्यात कांद्याचे उत्पादन रब्बी हंगामात तर मिरचीचे उत्पादन खरीप व रब्बी या दोन्ही हंगामात घेतले जाते.

शासनाने फळे व भाजीपाला या पिकासाठी बाजार समिती नियमन मुक्ती केली असल्याने शेतकरी फळे व भाजीपाला विक्रीसाठी बाजार समितीत आणत नाहीत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील ग्रामपंचायतीने दहा एकर जागा दिल्यास दोन मेगावॅट क्षमतेचा सौरउर्जा प्रकल्प उभारण्याचा घेतलेल्या निर्णयाबाबत**

**(१७) ८०८०५ (२८-०५-२०१७). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कोणत्याही ग्रामपंचायतीने दहा एकर जागा दिल्यास दोन मेगावॅट क्षमतेचा सौरउर्जा प्रकल्प उभारण्यासाठी शासन मदत करेल व ही विज थेट गावशिवारातील एक हजार शेतक-यांना देण्याची घोषणा शासनाने केली असल्याचे दिनांक २७ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घोषणेनुसार शासनाने कोणती आवश्यक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०८-०६-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) राज्यातील शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध करून देण्यासाठी "मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना" राज्यात दि. १४ जुन, २०१७ च्या शासन निर्णयान्वये सुरू करण्यात आली आहे. सदर योजनेची योग्यरित्या व जलद अंमलबजावणी होण्यासाठी दि. १७ मार्च, २०१८ च्या शासन निर्णयान्वये या योजनेत काही बदल/सुधारणा करण्यात आल्या आहेत. या नुसार महानिर्मिती व महावितरण या अंमलबजावणी यंत्रणांव्दारे राज्यातील ११ के.व्ही. ते १३२ के.व्ही. उपकेंद्राच्या परिघातील शासकीय जमीनीच्या उपलब्धतेचा शोध घेण्यात येऊन प्राथमिक व्यवहार्यता तपासणी करुन अशा शासकीय जमिनी ३० वर्षाच्या कालावधीकरिता नाममात्र रू. १/- या दराने भाडेपट्याने महसूल विभागाच्या मान्यतेने सौर कृषी वाहिनी प्रकल्पाकरिता उपलब्ध करून घेण्यात येत आहेत. या योजनेतील शासकीय जमिन उपलब्ध करून देण्याच्या सूचना सर्व जिल्हाधिकाऱ्यांना करण्यात आल्या आहेत. योजनेच्या पहिल्या टप्प्यात अशा प्राप्त शासकीय जमिनीवर महानिर्मितीव्दारे २०० मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प उभारण्याकरिता निविदा प्रकाशित करण्यात आल्या आहेत. तसेच ३०० मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प उभारण्यात येत आहेत. यात ग्रामपंचायतीच्या हद्दीतील जागांचाही समावेश आहे. महावितरणव्दारेही त्यांच्याकडे उपलब्ध असणाऱ्या जागेवरही सौर कृषी वाहिनी प्रकल्प उभारण्याचे काम सुरू आहे. याचा फायदा कृषी फिडरवर असणाऱ्या शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध करुन देण्यासाठी शक्य होणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही

---

**आदिवासी विकास महामंडळातील नोकरभरती प्रक्रियेत झालेला गैरव्यवहार**

**(१८) ८१३३३ (२८-०५-२०१७). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास महामंडळातील नोकरभरती प्रक्रियेत सुमारे ३०० कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारींच्या अनुषंगाने सुरु करण्यात आलेली चौकशी पूर्ण होऊन चौकशी अहवाल शासनास सादर झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यात काय आढळून आलेले आहे व तद्नुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, चौकशी पूर्ण झाली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत व यासाठी अजून किती कालावधी लागणे अपेक्षित आहे ?

**श्री. विष्णु सवरा (०७-०६-२०१८) :** (१) होय.

(२) चौकशी अहवालात नमुद बाबींची छाननी, पडताळणी करण्याची कार्यवाही सुरू आहे

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील धनगर समाजाला अनुसूचित जमातीमध्ये आरक्षण देण्याबाबत**

**(१९) ८२६४७ (२८-०५-२०१७). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने राज्यातील धनगर समाजाला अनुसूचित जमातीमध्ये आरक्षण देण्याचे आश्वासन दिले असतानाही त्याची पूर्तता केली जात नसल्याने धनगर आरक्षण संघर्ष समिती आणि भारत अगेन्स्ट करप्शन संघटनांनी जेलभरो आंदोलनाचा इशारा दिला असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या इशाऱ्याची दखल घेत राज्यातील धनगर समाजाला अनुसूचित जमातीत आरक्षण देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२८-०५-२०१८) :** (१), (२) व (३) धनगर किंवा धनगड एक आहेत किंवा कसे याबाबत टाटा इन्स्टिटयुट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई यांना संशोधन करुन अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

त्यानुसार टाटा इन्स्टटियुट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई या संस्थेकडून करण्यात आलेल्या सर्वेक्षण व संशोधनाच्या अनुषंगाने, महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांमधील १०८ तालुक्यामधील ३२४ गावांमध्ये भरलेल्या ५००० प्रश्नावली यांचे विश्लेषण मुख्य अहवालामध्ये समावेश करण्याचे काम सुरु आहे. तसेच अभ्यासक, अधिकारी व विशेष तज्ञ यांनी भेटी दिलेल्या विविध पाच राज्यांचा अभ्यास व त्यातुन मिळालेल्या माहितीचे एकत्रिकरण करुन त्याचे संकलन करण्यात आलेले आहे. विविध समित्या व आयोग यांचे अहवाल, भारतीय जाती-जमातीचा मानववंशशास्त्रीय, समाजशास्त्रीय ऐतिहासिकदृष्टया अभ्यास, न्यायालयीन न्यायनिवाडे आणि धनगर समाजातील नागरिकांनी सादर केलेले दस्तावेज या सर्वांचे चिकीत्सक परिक्षण करुन त्यांचे संकलन करण्यात आले असून या संकलनाला मुख्य अहवालामध्ये समाविष्ट करण्याचे काम सुरु आहे.

संकलीत माहितीच्या आधारे मुख्य अहवाल तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात असून टाटा इन्स्टटियुट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई या संस्थेकडून मुख्य अहवाल लवकरच सादर करण्यात येणार आहे.

आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडून दिनांक २.११.२०१५ रोजीच्या पत्रान्वये शासनास प्राप्त झालेला वस्तुस्थितीदर्शक अभिप्रायात्मक अहवाल प्राप्त झालेला आहे. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई यांचेमार्फत प्राप्त होणाऱ्या अंतिम अहवालानंतरच पुढील कार्यवाही अपेक्षित आहे.

---

**नंदूरबार जिल्हयातील आदिवासी भागातून बनावट जात प्रमाणपत्र बनवून देण्याऱ्या कारखान्याबाबत**

**(२०) ८२८६६ (२८-०५-२०१७). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदूरबार जिल्हयातील आदिवासी भागातून बनावट जात प्रमाणपत्र बनवून देण्याच्या कारखानाच असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बनावट जातीचे प्रमाणपत्र बनविणा-या या कारखान्यावर कारवाई करण्याबाबत तसेच बनावट जात प्रमाणपत्रास आळा घालण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०९-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही

(३) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**अमरावती जिल्हयातील आदिवासी विकास अप्पर आयुक्त कार्यालयाने कौशल्य प्रशिक्षणाचे कंत्राट व्हिटीपी नोंदणी नसलेल्या संस्थेला दिल्याबाबत**

**(२१) ८५६६१ (०९-०८-२०१७). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पश्चिम विदर्भ व मराठवाडयातील १३ जिल्हयांचे कार्यक्षेत्र असलेल्या अमरावतीच्या आदिवासी विकास अप्पर आयुक्त कार्यालयाने कौशल्य प्रशिक्षणाचे कंत्राट आपल्या मर्जीतील तसेच व्हिटीपी नोंदणी नसलेल्या संस्थांना देऊन कोटयावधींचा गैरव्यवहार केल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अप्पर आयुक्त कार्यालयांतर्गत शासकिय व अनुदानित आदिवासी आश्रमशाळा, वसतिगृहे चालविली जात असून वार्षिक अंदाजपत्रक ४५० कोटींचे असून विद्यार्थ्यांवर विविध योजनांच्या माध्यमातून प्रति विद्यार्थी २८ हजार रूपये खर्च केले जातात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रशिक्षणाकरीता व्होकेशनल ट्रेनिंग प्रोव्हायडरची (व्हीटीपी) नोंदणी असलेल्या संस्थांनाच प्रशिक्षणाचे कंत्राट देणे बंधनकारक असतांना नोंदणी नसलेल्या संस्थांना नियम डावलुन लाखोंचे कंत्राट देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, तसेच या संस्थांची कामे त्वरीत रद्द करून कामे मंजूर करणा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०६-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांनी २१ प्रशिक्षण कार्यक्रमांसाठी १७ संस्थांची निवड केली आहे. त्यापैकी १४ संस्थाची व्होकेशनल ट्रेनिंग प्रोव्हायडर (व्हीटीपी) म्हणून नोंदणी आहे, १ संस्था राष्ट्रीय उद्योजकता व लघु उद्योग विकास संस्थेशी संलग्न आहे, १ संस्था राष्ट्रीय लघु उद्योग महामंडळाशी संलग्न आहे तर महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ ही एक संस्था आहे.

(२) कौशल्य विकास योजना व आश्रमशाळा, वसतीगृह या योजनांचे कार्यान्वयन व अंदाजपत्रक वेगवेगळे असल्याने सदर उपप्रश्न येथे गैरलागू आहे.

(३) हे खरे नाही.

अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांनी २१ प्रशिक्षण कार्यक्रमांसाठी १७ संस्थांची निवड केली आहे. त्यापैकी १४ संस्थाची व्होकेशनल ट्रेनिंग प्रोव्हायडर (व्हीटीपी) म्हणून नोंदणी आहे, १ संस्था राष्ट्रीय उद्योजकता व लघु उद्योग विकास संस्थेशी संलग्न आहे, १ संस्था राष्ट्रीय लघु उद्योग महामंडळाशी संलग्न आहे तर महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ ही एक संस्था आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नंदुरबार येथील जातपडताळणी समिती अनुसूचित जमातीतील नागरिकांना जातीचे प्रमाणपत्र देतांना विविध कारणे सांगून अडचणी निर्माण करित असल्याबाबत**

**(२२) ९१५१२ (०९-०८-२०१७). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार येथील अनुसूचित जमातीतील टोकरे कोळी, ठाकूर जमातीतील नागरिकांना जातीचे प्रमाणपत्र देतांना विविध कारणे सांगून जातपडताळणी समिती अडचणी निर्माण करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुसूचित जमातीचे जे नागरिक न्यायालयात गेले आहेत त्यांनाच टोकरे कोळी व ठाकूर जमातीच्या प्रमाणपत्राची पडताळणी करुन समितीमार्फत देण्यात येत असून इतर नागरिकांना प्रमाणपत्राची पडताळणी करुन देण्यास समिती विलंब करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२८-०५-२०१८) :** (१) नाही.

(२) नाही.

समितीकडे प्रकरणाची संख्या अधिक असून त्या निकाली काढण्यासाठी मोहिम तत्वावर कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आदिवासी विभागाच्या संकेतस्थळावर अनेक त्रूटी असल्याने शिष्यवृत्ती अर्ज भरण्यास येत असलेल्या अडचणी

**(२३) ९२०७१ (०९-०८-२०१७). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पहिली ते बारावीपर्यंत शिक्षण घेणा-या आदिवासी विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्ती योजना राज्यात कार्यान्वीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऑनलाईन अर्ज करताना संकेतस्थळावर अनेक त्रूटी असल्याने शैक्षणिक सत्र संपले तरीही आदिवासी विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती अर्ज भरण्यात आले नसल्याने अनेक विद्यार्थी या योजनेपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संकेतस्थळावरील त्रूटी तातडीने दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे?

**श्री. विष्णु सवरा (०८-०६-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्ती योजनेचा लाभ इ. १ ली ते १० वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना देण्यात येतो.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उल्हासनगर (जि.ठाणे) येथील ब्राहमणपाडा परिसरातील आदिवासी मुलींच्या वसतिगृहाबाबत

**(२४) ९२६९३ (०९-०८-२०१७). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील ब्राहमणपाडा परिसरात असलेले आदिवासी मुलींचे वसतिगृह बंद करण्याचा निर्णय शासनाने माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत व सदर निर्णय मागे घेण्यात यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी प्रांत अधिकारी, उल्हासनगर व शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत तसेच याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. विष्णु सवरा (०८-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) मुलींच्या वसतीगृहाकरीता सध्या भाड्याने घेतलेल्या इमारतीचे भाडे जास्त असल्याने सदर इमारतीच्या भाड्यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाडून अभिप्राय सादर करण्याबाबत आयुक्त, आदिवासी विकास यांनी अपर आयुक्त, ठाणे यांना सूचना दिली होती. तथापि, सदर इमारतीकरीता निश्चित केलेले भाडे वाजवी असल्याबाबत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, ठाणे यांनी कळविले आहे. त्याप्रमाणे सध्या भाड्याने घेतलेल्या इमारतीतच सदर वसतीगृह सुरू आहे.

---

**महाड (जि.रायगड) शहर व परिसरात झालेल्या मुसळधार वादळी पावसामुळे अनेक ठिकाणी विद्युत खांब कोसळल्याबाबत**

**(२५) ९३२७८ (०९-०८-२०१७). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) शहर व परिसरात सुरु असलेल्या मुसळधार वादळी पावसामुळे अनेक ठिकाणी विद्युत खांब कोसळण्याचा घटना घडल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाड तालुक्यातील भावे ग्रामपंचायतीमधील पिंपळदरी येथील झाड विद्युत तारांवर पडल्यामुळे तीन विद्युत खांब पडल्याची घटना घडली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर घटनांमुळे तालुक्यातील विद्युत पुरवठा खंडित झाला असून माहे जून, २०१७ मध्ये झालेल्या वादळी पावसामुळे नादुरुस्त खांब दुरुस्त करतांना झालेल्या अपघातामध्ये श्री.रोहिदास पवार हा रोहा येथील कंत्राटी कामगार ४० टक्के जखमी झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२५-०५-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) महाड शहराजवळील विसावा हॉटेल जवळून जाणारी २२ के.व्ही. लाईनचे दोन पोल वादळामुळे पडले होते. पडलेले पोल उभे करण्याचे काम ठेकेदाराकडून चालू असताना श्री.रोहीदास पवार हा कंत्राटी कामगार जवळून जाणाऱ्या चालू असलेल्या २२ के.व्ही. राजेवाडी वाहिनीवर कोणाचेही आदेश नसताना पोलवर चढला. पोलवर चढत असताना त्याचा शर्ट ओला असल्यामुळे पूर्ण पोल चढण्याअगोदरच विद्युत प्रभारीत क्षेत्रामध्ये त्याला वीजेचा धक्का लागला.

सदर घटनेबाबत उपविभागीय अधिकारी, महावितरण, महाड यांनी चौकशी केली असता अपघात ग्रस्त व्यक्ती श्री. रोहिदास पवार यांच्या स्वत:च्या चुकीमुळे सदर अपघात घडलेला दिसून आला. तसेच अपघातग्रस्त श्री. रोहिदास पवार यांच्या स्वत:च्या चुकीमुळे अपघात घडल्यामुळे त्यांची महावितरण कर्मचारी अथवा कंपनीकडे कुठल्याही प्रकारची तक्रार नाही किंवा भविष्यातही राहणार नाही, असे लिखित स्वरुपात कळविल्याने पुढील कारवाई केलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चिमूर (जि.चंद्रपूर) येथील आदिवासी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना नाश्ता पुरविलेला नसल्याबाबत

**(२६) ९३६७५ (०९-०८-२०१७). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिमूर (जि.चंद्रपूर) येथील एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालयांतर्गत आदिवासी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना मागील चार महिन्यांपासून कंत्राटदाराने नाश्ता पुरविलेला नसल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषी कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०८-०६-२०१८) :** (१) व (२) माहे जानेवारी २०१७ ते मे २०१७ या कालावधीत चिमूर प्रकल्पांतर्गत शासकीय वसतीगृहातील विद्यार्थ्यांना नाश्ता पुरवठा न झाल्याबबत कोणत्याही वसतीगृहातील विद्यार्थ्यांची तक्रार प्रकल्प कार्यालयास अथवा आयुक्त कार्यालयास प्राप्त झालेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बोरबेट (ता.गगनबावडा, जि.कोल्हापूर) येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळेतील समस्यांबाबत

**(२७) ९४१४४ (०९-०८-२०१७). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरबेट (ता.गगनबावडा, जि.कोल्हापूर) येथील आदिवासी आश्रमशाळेमध्ये सन २०१५-१६ पासून कायमस्वरुपी मुख्याध्यापक नसून शिक्षकांची पदेही रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समस्यांबाबत मा. आदिवासी विकास मंत्री यांचे दालनात दि. ३० ऑगस्ट २०१६ रोजी बैठक झाली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कायमस्वरुपी मुख्याध्यापक व इतर पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०७-०६-२०१८) :** (१) होय, या आश्रमशाळेवर मुख्यध्यापकासह शिक्षक संवर्गाची ६ पदे मंजूर असून ४ पदे भरलेली आहेत व २ पदे रिक्त आहेत.
(२) होय.
(३) व (४) ठाणे विभागांतर्गत शिक्षक भरती करण्याबाबत अपर आयुक्त कार्यालयाकडून कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

---

**जव्हार (जि.पालघर) येथील शबरी वित्त विकास महामंडळाच्या जप्त केलेल्या वाहनांच्या लिलावात झालेला गैरव्यवहार**

**(२८) ९५९५६ (२९-१२-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जव्हार (जि.पालघर) येथील शबरी वित्त विकास महामंडळाने बेरोजगारांना व्यवसायासाठी दिलेल्या पाच वाहनांचे कर्ज हप्ते थकल्याने महामंडळाने जप्त केलेल्या वाहनांच्या विक्री लिलावात गैरव्यवहार झाला असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या गैरव्यवहारात ठाणे अप्पर आयुक्त कार्यालयातील कर्मचा-यांचा देखील सहभाग असून या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार शासनाचे नुकसान करण्यास जबाबदार असलेल्या संबधित अधिका-यांवर व कर्मचा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०६-०६-२०१८) :** (१), (२), (३) व (४) थकीत कर्ज वसुलीच्या नोटीसा प्राप्त झाल्यानंतर ४ लार्भार्थ्यांनी त्यांची वाहन नादुरूस्त असल्याने कर्ज भरणा करणे शक्य नसल्याने वाहने महामंडळाच्या कार्यालयात जमा केली होती. या वाहनांच्या विक्रीसाठी ७ वेळा विविध दैनिकांमध्ये जाहिराती देऊन शेवटी प्राप्त लिलावातील उच्चत्तम किंमतीला वाहनांची विक्री केलेली आहे.

सदर विक्री ही विहित मार्गाने झाली असल्याने चौकशी करून कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिंधुदुर्ग जिल्ह्यात वीज भारनियमन होत असल्याबाबत

**(२९) ९६३११ (२९-१२-२०१७). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यात वीज भारनियमन होत असून जिल्ह्यात कोणत्याही प्रकारची वीज चोरी अथवा वीज गळती नसूनही भारनियमनाचा त्रास ग्राहकांना सहन करावा लागत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज थकबाकी वाढल्याने जिल्ह्यातील डि ग्रुप मधील वीज ग्राहकांना वीज भारनियमनाचा त्रास होत असल्याचे स्पष्ट करण्यात आले असून वीज ग्राहकांना येत असलेल्या वाढीव बिलांमुळे सदर थकबाकी राहिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वीज ग्राहकांच्या वाढीव बिलांच्या समस्या सोडविण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा याबाबतची सद्यस्थिती काय आहे तसेच प्रश्न भाग १ मधील नमूद भारनियमन कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०५-२०१८) :** (१) वीज निर्मिती केंद्राना कोळशाच्या उपलब्धतेत व पुरवठयामध्ये येत असलेल्या अडचणीमुळे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये ०३.१०.२०१७ ते ०७.१०.२०१७ या कालावधीकरिता मा.वीज नियामक आयोगाने ठरविलेल्या निकषानुसार महावितरणमार्फत संपूर्ण राज्यात तात्पुरते भारनियमन करण्यात आले होते.

(२) वाढीव बिलांमुळे थकबाकी वाढली नसून वरील कालावधीत कमी वसुली व जास्त वीजहानी असलेल्या गटांतील वाहिन्यांच्या गरजेनुसार भारनियमान करण्यात आले. थकबाकीमध्ये माहे मार्च, २०१७ च्या तुलनेत वाढ झालेली आहे.

(३) वाढीव वीज बिलाबाबत उपविभागीय कार्यालयास प्राप्त झालेल्या लेखी तक्रारीच्या अनुषंगाने वीज ग्राहकांच्या बिलाच्या तक्रारीचे निरसन करण्यात आलेले आहे.

उपरोक्त कालावधीत भारनियमावर मात करण्यासाठी महावितरणकडून वीज उपलब्धता वाढविण्यासाठी वीजनिर्मिती कंपन्यांना सूचना देणे, संचाचे दुरुस्ती व देखभालाचे वेळापत्रक बदलणे, केंद्रीय वाटा व पॉवर एक्सेंज मधून अतिरिक्त वीज विकत घेणे लघुकालिन निविदा प्रकाशित करुन त्याद्वारे वीज खरेदी करणे इत्यादी उपाययोजना करण्यात आल्या होत्या.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंदगड (जि.कोल्हापूर) येथील महाराष्ट्र राज्य विज वितरण उपविभागाचे विभाजन करुन मजरे कार्वे येथे नविन उपविभागाची स्थापना करणेबाबत

**(३०) ९७३५३ (२९-१२-२०१७). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदगड (जि.कोल्हापूर) येथील महाराष्ट्र राज्य विज वितरण उपविभागाचे विभाजन करुन मजरे कार्वे येथे नविन उपविभागाची स्थापना करावी याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.उर्जा मंत्री यांना दि. ९ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०५-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) महावितरण कंपनीच्या विहित मानंकातील तरतुदीनुसार नवीन उपविभाग निर्मितीसाठी किमान ३०००० वीज ग्राहक संख्या असणे आवश्यक आहे. परंतु विद्यमान चंदगड विभागाचे विभाजनानंतर चंदगड व मजरे कार्वे या दोनही उपविभागांची ग्राहक संख्या अनुक्रमे १९२३९ व २८५७२ इतकी रहाणार असल्यामुळे दोन्ही कार्यालये ग्राहक संख्येचे निकष पूर्ण करु शकत नाहीत. तसेच सद्यस्थितीत नवीन कार्यालय निर्मितीची मानके व कर्मचारी/ ग्राहक मानके पुनर्विलोकनाची कार्यवाही महावितरण कंपनीने सुरु केली आहे. मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने आर्थिक वर्ष २०१६-१७ ते २०१९-२० या नियंत्रण कालावधीकरिता दि. ०३/११/२०१६ रोजी जारी केलेल्या बहुवर्षीय वीज दर आदेशान्वये रु.१०,६६१/- कोटीने संचलन व सुव्यवस्था खर्च कमी मंजूर केला आहे. त्यामुळे नवीन कार्यालय निर्मितीची मानके व कर्मचारी/ ग्राहक मानके प्रसृत केल्यानंतर, वरील प्रस्तावा संदर्भात आर्थिक दायित्वाचा विचार करुन धोरणात्मक निर्णय घेवून महावितरण कंपनीमार्फत उचित कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**म्हाडाने सर्वसामान्य नागरिकांना मिळणाऱ्या घरांसाठी प्रसिद्ध केलेल्या जाहीरातीमध्ये समावेश केलेल्या घरांची किंमत कोटींमध्ये असल्याबाबत**

**(३१) ९७७०८ (२९-१२-२०१७). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडाने सर्वसामान्य नागरिकांना मिळणाऱ्या घरांसाठी प्रसिद्ध केलेल्या जाहीरातीमध्ये समावेश केलेल्या घरांची किंमत कोटीमध्ये असल्याचे दिनांक १६ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रसिद्ध केलेल्या जाहिरातींमध्ये गरिबांसाठी फक्त ८ घरे उपलब्ध असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी म्हाडा प्राधिकरणांतर्गत सर्वसामान्यांच्या हितासाठी कोणती उपाययोजना राबविण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२८-०६-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

म्हाडाकडून प्राप्त अहवालानुसार सन २०१७ च्या मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या सोडतीमध्ये अत्यल्प उत्पन्न गट, अल्प उत्पन्न गट व मध्यम उत्पन्न गटाकरीताच्या सदनिका या म्हाडाच्या घराविषयक किंमती निश्चित करण्याच्या धोरणानुसार निश्चित केल्या असून सन २०१६-१७ च्या रेडी रेकनर व बाजार भाव / दर च्या तुलनेत ३५ ते ४० टक्के कमी आहेत. या सोडतीमधील फक्त लोअर परेल येथील उच्च उत्पन्न गटाकरीताच्या सदनिकांचे दर हे सन २०१६-१७ च्या रेडी रेकनर दराप्रमाणे एक कोटीच्या घरात सोडतीमार्फत उपलब्ध करुन देण्यात आले असुन तुंगा पवई येथील उच्च उत्पन्न गटाकरीताच्या सदनिकांची विक्री किंमत योजनेवर प्रत्यक्ष झालेला बांधकाम खर्च गृहित धरुन म्हाडाच्या धोरणानुसार निश्चित करण्यात आलेली आहे. मात्र सदर सदनिकांची किंमत बाजारभाव / दर च्या तुलनेत ३५ ते ४० टक्के कमी आहेत.

(२) व (३) हे खरे नाही.

म्हाडाकडून अत्यल्प उत्पन्न गटाकरीता व अल्प उत्पन्न गटाच्या जनतेकरीता परवडणाऱ्या सदनिकांची योजना राबविण्यात येत असते. या प्रमाणे सोडत २०१७ मधील सोडतीमध्ये वर नमूद केल्याप्रमाणे प्रतिक्षा नगर सायन, मानखुर्द, मागाठाणे बोरीवली, विक्रोळी पु., चारकोप कांदीवली, सिध्दार्थ नगर गोरेगाव, चांदिवली, विनोबा भावे नगर, कुर्ला आणि मालवणी, मालाड येथे एकूण २०० सदनिका मंडळाने वाजवी किंमतीत उपलब्ध करुन दिल्या आहेत. सदरहू उत्पन्न गटाकरीता उपलब्ध करुन दिलेल्या सदनिकांची विक्री किंमत ही सध्याच्या बाजार भाव / दराशी तुलना केल्यास सरासरी ३५ ते ४० टक्के कमी आहे. म्हाडाकडून नविन तंत्रज्ञान (New Technology) वापरुन वाजवी दरात व कमी वेळेत गरिबांसाठी परवडणारी घरे बांधण्यात येतात. सदर बांधण्यात आलेल्या सदनिकांच्या किंमती खाजगी विकासकांपेक्षा निश्चितच कमी असतात. त्यामुळे म्हाडाच्या घरांच्या सोडती करीता सर्व सामान्य जनतेकडून उत्तम प्रतिसाद मिळत असल्याचे, उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांनी त्यांच्या अहवालात नमूद केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### महाराष्ट्र राज्यात खाजगी गुंतवणूक, उद्योग उभारणी व रोजगार मागील दोन वर्षाच्या तुलनेत कमी असल्याबाबत.

**(३२) ९८३२८ (२९-१२-२०१७). ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेक इन इंडिया आणि मेक इन महाराष्ट्र सारखे कार्यक्रम रोजगार आणि गुंतवणूक आणण्यासाठी राज्य शासन अपयशी ठरल्याची माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील दोन वर्षाच्या तुलनेत फक्त २ टक्केच खाजगी गुंतवणूक झाली आहे तसेच रोजगार निर्मिती सन २०१६ मध्ये २५१३ निर्माण झाले असून नवीन उद्योग सुद्धा कमी आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(४) असल्यास, चौकशीअंती शासनाने उद्योग, गुंतवणूक आणि रोजगार निर्मितीसाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (३०-०५-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

मेक इन इंडिया २०१६ सप्ताहात उद्योग विभागासह अन्य विभागांनी केलेल्या एकूण २,९८४ सामंजस्य करारांपैकी २३५१ प्रकल्पांनी विविध टप्पे पूर्ण केले असून त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

| | प्रस्तावित | उत्पादनात गेलेले/बांधकामे पूर्ण झालेले/ जमीन ताब्यात घेतलेले प्रकल्प |
|---|---|---|
| एकूण सामजंस्य करार | २९८४ | २३५१ (७८.७८%) |
| गुंतवणूक (रु.कोटी) | ८,०४,८९७ | ५,१०,९०६ (६३,४७%) |
| रोजगार | ३०,४६,४४१ | २७,०४,३५६ (८८.७७%) |

(३), (४) व (५) उपरोक्त वस्तुस्थिती लक्षात घेता गुंतवणूक व रोजगार निर्मिती अनुक्रमे ६३.४७% व ८८.७७% असून, सदर प्रकल्प प्रत्यक्षात साकार होण्याच्या मार्गावर आहेत झालेले आहे.

---

**लातूर महावितरण विभागीय कार्यालयाचे ग्राहकांच्या व प्रशासकीय सोयीसाठी विभाजन करणेबाबत**

**(३३) ९९१९६ (२९-१२-२०१७). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर महावितरण विभागीय कार्यालयातील ग्राहक संख्या व भौगोलिक स्थिती व दोन तालुक्यातील पाच उपविभागांचा विस्तार लक्षात घेता स्थानिक लोकप्रतीनिधीनी केलेल्या मागणीनुसार मा.उर्जामंत्री महोदयांनी लातूर येथील दिनांक १० ऑक्टोबर, २०१५ रोजीच्या आढावा बैठकीत लातूर महावितरण विभागीय कार्यालयाचे लातूर विभाग १ व लातूर विभाग २ असे विभाजन करण्याबाबत आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचा विभाग १ व २ च्या निर्मितीचा प्रस्ताव मा.अधीक्षक अभियंता महावितरण लातूर यांनी मुख्य अभियंता, महावितरण परिमंडळ लातूर यांच्याकडे मान्यतेसाठी दिनांक१८ ऑगस्ट, २०१६ रोजी सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरच्या प्रस्तावास मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत व सदर प्रस्तावावर निर्णय घेण्यास शासनास किती कालावधी लागेल ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०५-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सदरचा प्रस्ताव महावितरणच्या मुख्य कार्यालयास दि. ०५.१२.२०१७ रोजी प्राप्त झालेला असून सदर प्रस्तावाची पडताळणी केली असता विभाजनाकरिता आवश्यक असलेली वीज ग्राहक संख्या कमी पडत असल्यामुळे सद्यस्थितीत लातूर विभागीय कार्यालयाचे विभाजन करणे शक्य नाही.
(४) महावितरण कंपनीकडून नवीन कार्यालय निर्मितीची मानके व कर्मचारी/ग्राहक मानके पुनर्विलोकनाची कार्यवाही सुरु असून ती कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर व सदर प्रस्तावासंदर्भात आर्थिक दायित्वाचा विचार करुन धोरणात्मक निर्णय घेऊन कंपनीकडून उचित कार्यवाही करण्यात येईल.

---

## राज्यातील शासकीय आणि विनाअनुदानित आश्रमशाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची ५ हजार ८०० पदे रिक्त असल्याबाबत

**(३४) ९९७९९ (२९-१२-२०१७). श्री.नारायण पाटील (करमाळा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शासकीय आणि विनाअनुदानित आश्रमशाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची ५ हजार ८०० पदे रिक्त असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळुन आले व त्यानुषंगाने उक्त् रिक्त पदे भरण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०७-०६-२०१८) :** (१) होय.
शासकीय आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची ५४३४ पदे रिक्त आहेत.
आदिवासी विकास विभागांतर्गत विना अनुदानित आश्रमशाळा नाहीत.
(२) व (३) रिक्त पदांचा आढावा घेण्यात आला असून अपर आयुक्त, आदिवासी विकास यांना रिक्त पदे भरण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार शिक्षक पदे भरण्यासाठी जाहिरात देण्यात आली आहे. याशिवाय पदोन्नतीने रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील आदिवासी विभागांतर्गत चालविल्या जाणाऱ्या आश्रमशाळांमध्ये अधीक्षक व गृहपालांची रिक्त असलेली पदे भरण्याबाबत**

**(३५) १००१५९ (२९-१२-२०१७). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आदिवासी विभागांतर्गत येत असलेल्या मुला-मुलींच्या निवासी शासकीय आश्रमशाळांमध्ये अधिक्षक व गृहपाल (पुरुष व महिला) या संवर्गाची सुमारे ४९९ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची पदे रिक्त राहण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरहू रिक्त पदे तातडीने भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०७-०६-२०१८) :** (१) नाही.

अधिक्षक (पुरूष व महिला) व गृहपाल (पुरूष व महिला) यांची २२० पदे रिक्त आहेत.

(२) व (३) रिक्त असलेली पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कृषी पंपाना ८ तासाऐवजी १० ते १२ तास वीज पुरवठा करणेबाबत**

**(३६) १००२४२ (२९-१२-२०१७). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी पंपाना ८ तासाऐवजी १० ते १२ तास वीज पुरवठा करण्याच्या मागणीनुसार पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली संबंधित जिल्हयात समिती स्थापन करण्याचा निर्णय मंत्रीमंडळाने माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयानुसार कोणकोणत्या जिल्हयात अशा प्रकारे समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत,

(३) असल्यास, या समितीमार्फत कशा स्वरुपाचे काम करण्यात येत आहे, त्याचा तपशील काय आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०५-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) राज्यात जळगांव, परभणी, अहमदनगर, अकोला, चंद्रपूर, गोंदिया, भंडारा, नागपूर, वर्धा, सोलापूर या जिल्हयांमध्ये समिती स्थापन करण्यात आलेली आहे.

(३) दिनांक ७.०९.२०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्यात कमी पर्जन्यमान असलेल्या जिल्ह्यामध्ये कृषी पंपासाठी दिवसा ८ तास किंवा रात्री १० तास ऐवजी १२ तास थ्री फेज वीज पुरवठा दिनांक ३१.१०.२०१७ पर्यंत करण्यासाठी, जिल्हा पातळीवर मा. पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करुन, सदर समितीच्या शिफारशीनुसार जिल्ह्यामध्ये निश्चित केलेल्या तालुक्यात/भागात कृषीपंपाना १२ तास वीज पुरवठा करण्याचे आदेश सर्व जिल्हाधिकारी कार्यालयास देण्यात आले होते. सदर समितीमध्ये जिल्हाधिकारी, जिल्हा कृषी अधिकारी, भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेचे वरीष्ठ वैज्ञानिक व महावितरण कंपनीचे संबंधित अधिक्षक अभियंता यांचा समावेश करण्यात आला होता.

---

**राज्यातील जेष्ठांच्या मान्य केलेल्या मागण्यांना दोन वर्षापासून मंजूरी देण्यात आली नसल्याबाबत**

**(३७) १०२१२८ (०६-०१-२०१८). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जेष्ठांच्या तत्वतः मान्य केलेल्या मागण्यांना दोन वर्षापासून मंजूरी देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागण्यांना तत्वतः मान्यता देवून सुध्दा अद्यापपर्यंत मागण्या मंजूर झाल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०१-०३-२०१८) :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) (१) जेष्ठ नागरिकांसाठी वृध्दाश्रम व मातोश्री वृध्दाश्रम चालविण्यात येतात.

(२) ६५ वर्षावरील नागरिकांना ओळखपत्र देण्यात येतात.

(३) ज्येष्ठ नागरिकांना बस प्रवास भाडयात सवलत देण्यात येते.

(४) जेष्ठ नागरिकांना परिपोषण/ निर्वाह भत्यासंदर्भात प्राप्त होणाऱ्या तक्रारीवर प्रत्येक विभागासाठी. न्यायाधिकरण स्थापन करण्यात आले असून त्यामध्ये पीठासीन अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी (महसूल) यांची नियुक्ती करण्यात आली आहे, तसेच जिल्ह्यांचे सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांना निर्वाह अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

(५) मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार जेष्ठ नागरिक धोरणाची माहिती सर्वसामान्य लोकापर्यंत पोहचविण्यासाठी विविध वर्तमानपत्रामध्ये व बस स्थानकांवर जाहिरात प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील १७६ साखर कारखान्यांच्या वजनकाटयांची तपासणी करणेबाबत

**(३८) १०४९४३ (०४-०४-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गाळप हंगाम सुरु असलेल्या १७६ साखर कारखान्यांच्या वजनकाटयांची तपासणी ३१ डिसेंबर पर्यंत करण्याचे आदेश मा.सहकार मंत्री यांनी माहे डिसेंबर, २०१७ रोजी दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आठ ते दहा साखर कारखान्याला १ भरारी पथक स्थापन करण्याचे पत्र साखर आयुक्तांनी मा.जिल्हाधिकारी यांना पाठवले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी भरारी पथक नेमून आतापर्यंत किती वजनकाट्यांची तपासणी करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०१-०६-२०१८) :** (१) होय.

(२) होय.

(३) हंगाम २०१७-१८ मध्ये १८७ साखर कारखान्यांनी गाळप हंगाम घेतला आहे. जिल्हानिहाय स्थापन भरारी पथकांनी चालू १८६ साखर कारखान्यांच्या वजनकाट्याची तपासणी केली आहे. भरारी पथकाच्या प्राप्त तपासणी अहवालानुसार वजनकाट्यामध्ये कोणतीही त्रुटी नसल्याचे तसेच सर्व वजनकाटे सुयोग्य स्थितीत असल्याचे आढळून आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### बुलढाणा जिल्हयातील शासकीय उडीद खरेदीत झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(३९) १०४९८५ (०४-०४-२०१८). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील नाफेडच्या खरेदी केंद्रावर शासकीय उडीद खरेदीत मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाल्याने चौकशी सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०८-०६-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) बुलढाणा व चिखली खरेदी केंद्रावरील अनियमिततेबाबत जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,बुलढाणा यांच्याकडे प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने त्रिसदस्यीय चौकशी समिती नियुक्त करुन चौकशी करण्यात आली आहे. यामध्ये बुलढाणा खरेदी केंद्रावर तीन व्यक्तीनी विविध प्रकारे गैरबाबी करुन शासनाची दिशाभूल केलेली आहे. तसेच चिखली येथे १७ ट्रेडर्स/आडते खरेदीदारानी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात कमी दराने शेतकऱ्यांकडून उडीद खरेदी करुन शेतकऱ्यांच्या नावे शासकीय योजनेमध्ये विकला आहे.

चौकशी अहवालानुसार दोषी व्यक्तीविरुध्द जिल्हा पणन अधिकारी, बुलढाणा यांनी दिनांक १०/०२/२०१८ रोजी प्रथम माहिती अहवाल (FIR) दाखल केली आहे.

---

**राज्यातील आदिवासी आश्रमशाळेतील महिला अधिक्षकांची पदे भरण्याबाबत**

**(४०) १०५८२३ (०४-०४-२०१८). प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी आश्रमशाळेतील मुलींच्या सुरक्षेची कोणतीही जबाबदारी घेतली जात नसल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुदानित आश्रमशाळांना मंजुरी देतांना मुलींच्या सुरक्षेबाबत कोणत्याही प्रकारच्या अटी वा निर्बंध संस्थाचालकांवर घालण्यात येत नसून शासकीय आणि अनुदानित आश्रमशाळांमध्ये महिला अधिक्षकाची ५०% पदे मंजूर असूनही अद्यापही सदर पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त विषयाच्या अनुषंगाने सदरहू रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०७-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

शासकीय व अनुदानित आश्रमशाळेतील महिला अधिक्षकांची १०९८ पदे मंजूर असून त्यापैकी ७८३ पदे भरलेली आहेत. सद्यस्थितीत ३१५ पदे रिक्त आहेत.

(३) व (४) शासकीय आश्रमशाळेतील रिक्त पदे अपर आयुक्त कार्यालयामार्फत व अनुदानित आश्रमशाळेतील रिक्त पदे संबंधीत संस्थेमार्फत भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**आर्णी (जि.यवतमाळ) तालुक्यातील गुरांचा बाजार वसुली ठेका संपला असला तरी अनधिकृत ठेकेदाराकडून दामदुप्पट वसुली सुरू असल्याबाबत**

**(४१) १०६५७३ (२३-०४-२०१८). श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्णी (जि.यवतमाळ) तालुक्यातील गुरांचा बाजार वसुली ठेका गत् काही महिन्यांपूर्वी संपुष्टात आला असूनही अनधिकृत ठेकेदाराकडून दामदुप्पट वसुली सुरू असून तो रद्द करून कृषी उत्पन्न बाजार समितीने स्वत: चालवावा अशी मागणी सभापतीकडे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीनुसार शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (११-०६-२०१८) :** (१) व (२) गुरांचे बाजार अनधिकृत चालवित असल्याबाबत दि.१५.५.२०१७ रोजीचा तक्रार अर्ज बाजार समितीस दि.२१.६.२०१७ रोजी प्राप्त झाला आहे. प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने बाजार समितीने चौकशी केली असून कृषी उत्पन्न बाजार समिती आर्णी या बाजार समितीने सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरीता गुरांचे बाजाराचा दिलेला ठेक्याचा कालावधी दि.४.५.२०१७ रोजी संपुष्टात आला आहे. दिनांक ५.५.२०१७ पासून बाजार समिती स्वत: गुरांचे बाजार चालवित आहे.

(३) तक्रारीत तथ्य आढळून आले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे पिंप्री सैय्यद (ता.जि.नाशिक) येथे कृषी टर्मिनल मार्केट विकसित करण्याबाबत**

**(४२) १०६६५५ (२४-०४-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पिंप्री सैय्यद (ता.जि.नाशिक) येथे कृषी टर्मिनल मार्केट उभारण्यासाठी निश्चित केलेली जागा कृषी पणन मंडळास हस्तांतरित करण्यासाठी ग्रामविकास, नगरविकास तसेच महसूल व वन विभागाने सहमती दर्शवूनही माहे जानेवारी, २०१८ पर्यंत सदर जागा कृषी पणन मंडळास उपलब्ध करून देण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक येथे टर्मिनल मार्केट विकसित करण्यासाठी खाजगी भागीदारीकरीता व्यवसाय आराखडा तयार करून त्याबाबतचा सविस्तर अहवाल माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान कृषी व पणन मंडळाने शासनास सादर केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०४-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.
मौजे पिंप्री सैय्यद (ता.जि.नाशिक) येथे कृषी टर्मिनल मार्केट उभारण्यासाठी निश्चित केलेली जागा कृषी पणन मंडळास हस्तांतरित करण्याकरीता मंत्रीमंडळाने मान्यता दिली आहे. या निर्णयाप्रमाणे महसूल विभागाकडून जमिन हस्तांतर करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.
(२) व (३) खाजगी भागीदारीतून टर्मिनल मार्केट उभारण्याचे प्रस्तावित असल्यामुळे त्यानुसार Business Model व प्रकल्प अहवाल महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ यांचेकडून मागविण्यात आलेला आहे. सदर अहवाल शासनास प्राप्त झाल्यानंतर टर्मिनल मार्केट उभारण्याबाबतची कार्यवाही शासनस्तरावरुन करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात सामाजिक न्याय विभागामार्फत रक्त संबंधांवर देण्यात येणारी जात वैधता प्रमाणपत्रे कोणत्याही कागदपत्राची मागणी न करता आदिवासी कुटूंबांना देण्याबाबत**

**(४३) १०७११८ (२४-०४-२०१८). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सामाजिक न्याय विभागामार्फत रक्त संबंधांवर देण्यात येणारी जातवैधता प्रमाणपत्रे आदिवासी कुटूंबाना कोणत्याही कागदपत्राच्या पुराव्या शिवाय देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, मा.सामाजिक न्याय मंत्री यांचेकडे दिनांक १५ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२८-०५-२०१८) :** (१) व (२) होय शासनाने, " महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० लागू केलेला आहे. सदर अधिनियमांतर्गत आदिवासी विकास विभागाने अनुसूचित जमातीसाठी "महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २००३ तयार केलेले आहेत. तसेच सामाजिक न्याय विभागाने उर्वरित मागासवर्गीय प्रवर्गासाठी"

महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २०१२ तयार केलेले आहेत.

सामाजिक न्याय विभागाच्या नियम २०१२ मधीम नियमांमध्ये सुधारणा करण्यासाठी मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. सदर सुधारणा हया अनुसूचित जमाती करिता नियम २००३ साठी लागू नाही.

सामाजिक न्याय विभागाच्या धर्तीवर, अनुसूचित जमातीसाठी जातीचे प्रमाणपत्र /वैधता प्रमाणपत्र देणेविषयक नियमांनाही सदर सुधारणा लागू करण्याबाबत अभिप्राय देण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमिती नेमण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आहे. त्यानुषंगाने शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, दिनांक १५.११.२०१७ अन्वये मा.मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती गठीत करण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने मंत्रीमंडळ उपसमितीची पहिली बैठक दि. २८.११.२०१७ रोजी संपन्न झाली. तद्नंतर दुसरी बैठक दि. १८.०४.२०१८ रोजी संपन्न झाली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आदिवासी विकास महामंडळाकडून शेतकऱ्यांना तेलपंप व एच.डी पी पाईपचा पुरवठा होत नसल्याबाबत

**(४४) १०७१४० (२४-०४-२०१८). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी विकास महामंडळांकडून आदिवासी शेतक-यांना सन २०१४-१५ पासून तेलपंप इंजिन पुरवठा व एचडीपी पाईपचाही पुरवठा झालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या विविध योजना राबविण्यासाठी दिलेला निधी अखर्चित राहिलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच निधी अखर्चित ठेवणा-या अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०६-०६-२०१८) :** (१) व (२) खरे आहे.

(३) व (४) तेलपंप, वीजपंप व एच.डी.पी.ई.पाईप खरेदीसाठी प्रसिध्द झालेल्या निविदेस काही तांत्रिक व प्रशासकीय कारणास्तव विलंब झाला तद्नंतर निविदा रद्द करण्यांत आल्या. यास्तव परिणामकारक अंमलबजावणीसाठी सदर योजना कृषि विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आली आहे. आता सदर योजना कृषि विभागामार्फत राबविण्यात येणार असून सदर विभागाकडूनच आदिवासी लाभार्थ्यांना थेट लाभ हस्तांतरणाद्वारे निधी वितरीत करण्यात येणार आहे.

---

**शहापूर (जि.ठाणे) येथे आदिवासी मुला-मुलींची ५०० विद्यार्थी क्षमता असलेल्या वसतीगृहास मान्यता देण्याबाबत**

**(४५) १०७२९३ (२४-०४-२०१८). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) येथे आदिवासी मुला-मुलींची ५०० क्षमता असलेल्या वसतीगृहास मान्यता देण्याची मागणी मा.आदिवासी विकास मंत्री यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ११ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहापूर (जि.ठाणे) येथे ४ इंजिनिअरिंग महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, महाविद्यालय असल्याने तालुक्यातील आदिवासी विद्यार्थी मोठ्या प्रमाणात येथे शिक्षण घेत असून वसतीगृह क्षमता ७५ असल्याने आदिवासी विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या ठिकाणी ५०० विद्यार्थी क्षमता असलेल्या वसतीगृहास मान्यता देण्यायाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०८-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) वसतींगृहासाठी शहरामध्ये जागा मिळविणे, बांधकाम करणे, त्याची देखभाल दुरुस्ती, तसेच भाड्याच्या इमारतीसाठी भाड्याची रक्कम देणे, वसतीगृहाच्या व्यवस्थापनासाठी कर्मचारी नियुक्ती व त्यांचे वेतन व भत्ते अशा प्रकारचे शासनाचे खर्च कमी करण्यासाठी नवीन वसतीगृह मंजूर करण्याऐवजी वसतीगृहामध्ये प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना भोजन, निवास व इतर शैक्षणिक साहीत्य उपलब्ध करुन घेण्यासाठी थेट रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये जमा करण्याबाबत सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून पंडीत दीनदयाल उपाध्याय स्वयंम् योजना सुरू करण्यात आलेली आहे.

सन २०१८-१९ पासून सदर योजनेचा विस्तार तालुकास्तरापर्यंत करण्याचे प्रस्तावित आहे.

---

**राज्यातील सर्व सहकारी व खाजगी साखर कारखान्यांचे ऊस वजन काटे ऑनलाईन करण्याबाबत**

**(४६) १०७९३० (२४-०४-२०१८). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व सहकारी व खाजगी साखर कारखान्यांचे ऊस वजन काटे ऑनलाईन पद्धतीने जोडण्याचे निर्देश साखर आयुक्तांनी माहे डिसेबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्देशानुसार वजन काटे ऑनलाईन पध्दतीने जोडण्यात आले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने वजन काटे ऑनलाईन पद्धती जोडण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०८-०६-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) कारखाना स्तरावर वजनकाटे ऑनलाईन पध्दतीने जोडण्याची कार्यवाही चालू आहे. सर्व साखर कारखाना स्तरावर वजनकाटे ऑनलाईन करण्याच्या अनुषंगाने संगणकीकरण करण्यात येत असून कारखान्यांचे वजनकाटे ऑनलाईन करण्याची कार्यवाही चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील बहुतांशी कंपन्या अनधिकृत असल्याबाबत**

**(४७) १०८५६१ (२४-०४-२०१८). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात गेल्या सहा महिन्यांपासून बऱ्याच कंपन्या पूर्णपणे अनधिकृत असून केवळ नोंदणी करून आर्थिक व्यवहारासाठी त्याचा वापर केला जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील १० वर्षात या अनधिकृत कंपन्यांनी लेखापरीक्षण केले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित अनधिकृत कंपन्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०६-०६-२०१८) :** (१), (२), (३) व (४) कंपन्यांची नोंदणी हा विषय केंद्र सरकारच्या केंद्रीय कॉर्पोरेट मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याशी संबंधित आहे.

---

**मालखेड (ता.चांदुर रेल्वे, जि.अमरावती ) येथील इदगाह व कनिष्ट महाविद्यालयालगत इंदिरा निवास झोपडपट्टीच्या ठिकाणी प्रस्तावित बियरबारला परवानगी न देणेबाबत**

**(४८) १०८७४८ (२४-०४-२०१८). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.रणजीत कांबळे (देवळी), श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालखेड (ता.चांदुर रेल्वे, जि.अमरावती) येथील इदगाह व कनिष्ट महाविद्यालयालगत इंदिरा निवास झोपडपट्टीच्या ठिकाणी प्रस्तावीत बियरबारला ग्रामस्थांचा विरोध असल्याने त्याला परवानगी न देणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, अमरावती यांना दिनांक २५ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यादरम्यान लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०८-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) प्रस्तावित परवाना कक्ष महाराष्ट्र विदेशी मद्य नियम १९५३ चे ४५ (१) नुसार आंतरनिर्बंधमुक्त नाही असे चौकशीत निष्पन्न झाल्याने सदर परवाना कक्ष/ बियरबार सुरु करण्यास परवानगी देण्यात आली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मौजे वशी (ता.वाळवा, जि.सांगली) या गावातून ऊस परराज्यात गळीतास नेत असल्याबाबत

**(४९) १०९३८८ (२४-०४-२०१८). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१७-२०१८ च्या ऊस गळीत हंगामामध्ये ऊसाचे उत्पादन व पर्यायाने साखर उत्पादन कमी झाली असल्याने साखर उद्योग पूर्ण क्षमतेने चालविण्यासाठी परराज्यात होणाऱ्या ऊस निर्यातीवर दिनांक १ नोव्हेंबर, २०१७ पासून बंदी घातली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बंदी असताना मौजे वशी (ता.वाळवा, जि.सांगली) या गावातून ऊस परराज्यात जात असताना दिनांक २० नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास वाळवा पोलिसांनी ट्रक पकडला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने बंदी असताना ऊस निर्यात करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०१-०६-२०१८) :** (१) होय.
(२) नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आदिवासी नसलेल्या व्यक्तींना आदिवासी असल्याचे जातीचे दाखले देण्यात येऊन पडताळणीमध्ये वैध ठरविण्यात येत असल्याबाबत**

**(५०) १०९६८३ (२४-०४-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी नसलेल्या व्यक्तींना आदिवासी असल्याचे जातीचे दाखले देणे आणि नंतर पडताळणीमध्ये असे दाखले वैध ठरविणे यात शासकीय अधिकारी व जात पडताळणी समितीच्या सदस्यांनी गैरकरभार केला असून आदिवासी विकास आयुक्तांनी अशा प्रकरणांची चौकशी करावी असे निर्देश मा.उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने माहे डिसेंबर, २०१७ मध्ये दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्देशाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले, तसेच आदिवासी विकास आयुक्तांनी किती प्रकरणांची चौकशी केली आहे,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी आढळणा-या व्यक्तींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०७-०६-२०१८) :** (१), (२) व (३) मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील रिट याचिका क्र.९७९७/२०१७ श्री.मच्छिंद्र सोनीराम नागटिळक विरूध्द महाराष्ट्र शासन व इतर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दि.२८.११.२०१७ रोजी अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, पुणे व औरंगाबाद या समिती कार्यालयाशी निगडित असलेल्या प्रकरणी पुनश्च फेरतपासणी करून सहा महिन्याच्या कालावधीत निर्णय घेण्याचे आदेश पारित केले आहेत. त्यानुसार अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, पुणे या समितीकडील ६ प्रकरणे व अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद या समितीकडील ४ प्रकरणे अशा एकूण १० प्रकरणामध्ये संबंधित तपासणी समितीकडून फेरतपासणी सुरू आहे. तसेच मा.उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.९७९७/२०१७ प्रकरणी दि.२८.११.२०१७ रोजी दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करण्याबाबत आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**

**नागपूर.** **प्रधान सचिव,**

**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.